ijamrsd.com
ISSN: 2583-6404
Journal of Advanced Multidisciplinary Research Studies and Development
Peer Reviewed Referred Journal Bi-monthly Open Access

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सामाजिक सेवा क्षेत्रातील खर्चाचा सर्वसामान्यांवर होणारा परिणाम

**मंगेश संतोष किनगे[1], प्रा. विदुला व्यवहारे[2]**

*[1] संशोधक विद्यार्थी, प्रो. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे-४४ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.*

*Email: mangeshkinge@gmail.com*

*[2] मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, प्रो. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे-४४.*

**सारांश:**

प्रस्तुत शोधनिबंध पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक सेवांच्या परिणामकारकतेचा आणि व्याप्तीचा आढावा घेतो. औद्योगिक शहर म्हणून वेगाने विकसित होत असताना शहरीकरणाचा वाढता वेग आणि वाढत्या लोकसंख्येच्या गरजा सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. विकासाबरोबर शहरातील सर्व स्तरांतील नागरिकांपर्यंत सामाजिक कल्याणाचे लाभ पोहोचवणे हे एक मोठे आव्हान आहे. या शोधनिबंधात प्रामुख्याने आरोग्य सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता आणि गरिबी निर्मूलन योजनांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. प्राथमिक आणि दुय्यम माहितीच्या आधारे हा अभ्यास सामाजिक सेवा वितरणातील अडचणी शोधतो आणि महानगरपालिकेच्या योजना अधिक लोकाभिमुख करण्यासाठी सुधारणात्मक उपाय सुचवण्याचा प्रयत्न करतो. पिंपरी-चिंचवडमधील शहरी गरिबांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. संशोधनामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सामाजिक सेवांवरील खर्चाचा नागरिकांना झालेल्या लाभाचा आढावा घेणे हा आहे. या संशोधनासाठी प्रामुख्याने प्राथमिक माहितीचा वापर करण्यात आला असून यामध्ये प्रश्नावली तयार करून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील ५५८ नागरिकांकडून ही प्रश्नावली भरून त्यांना महानगरपालिकेकडून मिळालेल्या सामाजिक सेवा सुविधांच्या परीणामकारकतेचा आढावा घेण्यात आलेला आहे. शेवटी, सामाजिक सेवांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी उपाययोजनांची शिफारस या शोधनिबंधात करण्यात आलेल्या आहे.

**मुख्य शब्द:** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, सामाजिक सेवा खर्च, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, घनकचरा व्यवस्थापन.

► *Corresponding Author: मंगेश संतोष किनगे*

## १. प्रस्तावना (Introduction):

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ज्याला 'आशियातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका' आणि 'कामगार नगरी' म्हणून सुद्धा ओळखले जाते, येथे सामाजिक खर्चाचे नियोजन हे शहराच्या सर्वांगीण विकासाचे निदर्शक आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या लोकासंखेतील दशवार्षिक बदलाचा अभ्यास केला असता १९६१ मध्ये ५०.३९ टक्के होता. तर तो १९८१ मध्ये १५५.४२ टक्के एवढा मोठ्या प्रमाणावर असलेला पाहायला मिळतो . तर २०११ मध्ये त्यामध्ये काही प्रमाणामध्ये घात होऊन ७१.९८ टक्के होता. आणि त्याचा परिणाम १९८१ मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची लोकसंखेची घनता २९२७ चौ.कि.मी. होती ती वाढून २०११ मध्ये ९७७० चौ.कि.मी. पर्यंत झालेली पाहायला मिळते. यावरून असे दिसून येते की लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्या प्रमाणात सामाजिक सेवा सुविधा वाढणे गरजेचे आहे. आणि त्या प्रमाणात सामाजिक सेवांची वाढ ना झाल्यास त्याचा परिणाम नागरिकांच्या कल्याणावर होताना पहाताला मिळतो. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक स्वरूप पाहता सामाजिक सेवांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीचा कणा आहेत. शहरीकरणाच्या वेगात,

महानगरपालिकांची भूमिका केवळ रस्ते आणि पाणीपुरवठा करण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामाजिक सेवांवर खर्च करणे हे त्यांचे प्राथमिक कर्तव्य बनलेले आहे. सामाजिक सेवा शहरी जीवन सुखकर होण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे या सर्व सुविधांचा विकास करणे किंवा त्याचा नागरिकांना योग्य प्रकारे लाभ घेता यावा यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रयत्न करताना पाहायला मिळते. परिणामी महानगरपालिकेच्या विकासासोबतच सामाजिक सेवावरील खर्चामध्येसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झालेली पाहायला मिळते.

### २. संशोधनाचे महत्त्व (Significance of Study):

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे वेगाने वाढणारे शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यांच्या गरजा भागवण्यासाठी महानगरपालिका आपल्या अर्थसंकल्पातील मोठा हिस्सा सामाजिक पायाभूत सुविधांवर खर्च करण्यात येतो. आणि त्या केलेल्या खर्चाचा नागरिकांना सामाजिक सेवा सुविधा पुरविल्यानंतर त्याचा नागरिकांना किती लाभ होतो याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

### ३. समस्या विधान (Problem Statement):

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या एकूण अर्थसंकल्पामध्ये सामाजिक सेवांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येते. मात्र, वाढत्या शहरीकरणामुळे आणि लोकसंख्येच्या मोठ्या दबावामुळे या खर्चाचा नागरिकांना प्रत्यक्ष कशाप्रकारे लाभ होतो हे अभ्यासाने आवश्यक आहे.

### ४. उद्दिष्टे (Objectives):

१. सामाजिक सेवा खर्चाचा नागरिकांना होणाऱ्या लाभाचा अभ्यास करणे.

### ५. संशोधन पद्धती (Research Methodology):

महानगरपालिकेच्या खर्चाचा अभ्यास हा प्रामुख्याने वर्णनात्मक स्वरूपाचा आहे. या संशोधनात महानगरपालिकेने सामाजिक सेवांवर केलेल्या खर्चाचा जनतेला झालेल्या लाभाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यासाठी प्राथमिक स्रोताचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी महानगरपालिकेतील नागरिकांची प्रश्नावली तयार करून लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहेत. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील ५५८ लाभार्थ्यांची सोयीस्कर नमुना निवड पद्धतीने निवड करून त्याच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात आलेली आहे.

### ६. संशोधनाची व्याप्ती (Scope of Research):

प्रस्तुत शोधनिबंधात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील नागरिकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. यामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सामाजिक सेवांवर केलेल्या खर्चाचा नागरिकांना कश्या प्रकारचा लाभ झालेला आहे. त्यामुळे हे संशोधन सर्व महानगरपालिकांना लागू होतीलच असे नाही कारण यामध्ये फक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

### ७. माहितीचे विश्लेषण (Data Analysis):

उत्तरदात्यांकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादांनुसार, विश्लेषणासाठी प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या सर्वेक्षण माहितीचे विश्लेषण केल्यानंतर पुढील निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

**तक्ता क्रमांक १ प्रतिसादकर्त्यांचे सामाजिक-लोकसंख्याशास्त्रीय माहिती**

| लोकसंख्याशास्त्रीय चल | घटक | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| लिंग | पुरुष | ४२७ | ७६.५ |
| | महिला | १३१ | २३.५ |
| वय | २५ ते ३५ वर्षे | १३४ | २४.० |
| | ३६ ते ४५ वर्षे | ३०४ | ५४.५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४६ ते ५५ वर्षे | ९२ | १६.५ |
| | ५६ ते ६५ वर्षे | १४ | २.५ |
| | ६६ व त्यापेक्षा जास्त | १४ | २.५ |
| **कुटुंबाचा रहिवास** | ० ते ५ वर्षे | ५६ | १०.० |
| | ६ ते १० वर्षे | १२८ | २३.० |
| | ११ ते १५ वर्षे | १८३ | ३२.८ |
| | १६ व त्यापेक्षा जास्त | १९१ | ३४.२ |
| **व्यवसाय** | सेवा (शिक्षक, वकील, डॉक्टर इ.) | ५३ | ९.५ |
| | गृहिणी | ५९ | १०.६ |
| | व्यवसाय | ८० | १४.३ |
| | मजुरी | २१ | ३.८ |
| | सरकारी नोकरी | ५१ | ९.१ |
| | खाजगी नोकरी | २९४ | ५२.७ |
| **वार्षिक उत्पन्न** | ० ते १ लाख रु. | ९४ | १६.८ |
| | १ लाख १ ते २ लाख रु. | ६० | १०.८ |
| | २ लाख १ ते ३ लाख रु. | ८१ | १४.५ |
| | ३ लाख १ ते ४ लाख रु. | ८६ | १५.४ |
| | ४ लाख १ ते ५ लाख रु. | ११३ | २०.३ |
| | ५ लाख रु. पेक्षा अधिक | १२४ | २२.२ |

स्रोत : क्षेत्रीय पाहणी

वरील तक्ता क्र. १ मध्ये उत्तरदात्यांच्या लोकासंख्याशास्त्रीय माहितीचे विश्लेषण केलेले आहे. ७६.५% उत्तरदाते पुरुष आहेत, तर २३.५% महिला आहेत. उत्तरदात्यांचे विविध वयोगटांमध्ये वर्गीकरण केले असता सर्वात मोठा गट ३६ ते ४५ वर्षे वयोगटात आहे, ज्यामध्ये ३०४ उत्तरदाते होते. सर्वात लहान गट २.५% उत्तरदाते ५६ ते ६५ वर्षांतील आणि ६६ व त्यापेक्षा जास्त वयाचे होते. उत्तरदात्यांचे रहिवासानुसार विविध गटांमध्ये वर्गीकरण केले असता. सर्वात जास्त १९१ (३४.८%) उत्तरदाते १६ आणि त्यापेक्षा अधिक वर्षे राहत असलेले आहेत. तर सर्वात कमी ० ते ५ वर्षे राहत असलेल्या उत्तरदात्यांची संख्या ५६ (१०%) आहे. उत्तरदात्यांचे व्यवसायानुसार विविध गटांमध्ये वर्गीकरण केले असता. खाजगी नोकरी असलेल्यांची संख्या सर्वात जास्त म्हणजे २९४ (५२.७%) आहे. तर सर्वात कमी मजुरी करत असलेल्या उत्तरदात्यांची संख्या २१ (३.८%) आहे. उत्तरदात्यांच्या वार्षिक उत्पन्नाबद्दल माहितीचे वितरण करण्यात आलेले आहे. बहुसंख्य म्हणजेच १२४ उत्तरदाते ५ लाख रु. पेक्षा अधिक उत्पन्नामध्ये येतात, जे एकूण उत्पन्नाच्या २२.२% आहेत. तर सर्वात कमी ६० उत्तरदाते १ लाख १ ते २ लाख रु. उत्पन्नामध्ये येतात, जे एकूण उत्पन्नाच्या १०.८% आहेत. यावरून संशोधनासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांच्या लोकासंख्याशास्त्रीय माहिती मिळते ज्यामध्ये सर्व गटातील नागरिकांचा समावेश करण्यात आलेला पाहायला मिळतो.

**तक्ता क्रमांक २ महानगरपालिकेकडून मिळालेल्या सेवा सुविधेबद्दल समाधानाविषयी मत**

| **सेवा सुविधाविषयी समाधान** | **उत्कृष्ट** | **चांगले** | **समाधानकारक** | **असमाधानकारक** | **मध्यक (Median)** |
|---|---|---|---|---|---|
| पाणीपुरवठा | १६१ | १६७ | १९५ | ३५ | **२** |
| स्वच्छता प्रदान करणे | ९५ | १६२ | २३६ | ६५ | **३** |
| पथदिवे पुरवणे | १२४ | २०८ | १९४ | ३२ | **२** |
| शैक्षणिक सुविधा | ११५ | २०० | २०५ | ३८ | **२** |
| आरोग्य सुविधा | ७५ | २१३ | १८३ | ८७ | **२** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महिला व बाल कल्याण | ८४ | १४७ | २११ | ११६ | **३** |
| ज्येष्ठ नागरिक सेवा | ९३ | १७५ | १५९ | १३१ | **३** |
| आर्थिक व स्वयंरोजगार सेवा | ८९ | १२८ | २०९ | १३२ | **३** |
| रस्त्यांची देखभाल आणि बांधकाम | ६८ | २२० | १५० | १२० | **२** |
| उद्यानांची देखभाल आणि विकास | ५३ | २५७ | १५६ | ९२ | **२** |
| क्रीडांगणांची देखभाल आणि विकास | १०० | १५६ | २०६ | ९६ | **३** |
| बाजारांची देखभाल आणि विकास | ५६ | २१५ | १६७ | १२० | **३** |
| सांडपाण्याची विल्हेवाट | ६३ | १६३ | १४५ | १८७ | **३** |
| घनकचरा व्यवस्थापन | ९१ | १८० | १५५ | १३२ | **३** |
| आपत्कालीन सेवा | ११२ | २३८ | ८३ | १२५ | **२** |

स्रोत : क्षेत्रीय पाहणी

वरील तक्ता क्रमांक २ नुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून मिळत असलेल्या सामाजिक सेवा सुविधांचा नागरिकाच्या समाधानाचा आढावा घेण्यात आलेला आहे. एक सुव्यवस्थित पाणी पुरवठा व्यवस्था हे महापालिकेचे मूलभूत कार्य मानले जाते. ही केवळ जीवनाची मूलभूत गरज म्हणून नाही तर सार्वजनिक आरोग्य कार्य म्हणूनही आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी २८.९% उत्तरदात्यांनी पाणीपुरवठा सेवा सुविधाबद्दल 'उत्कृष्ट' असल्याचे आणि २९.९% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ ६.३% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'चांगले' (२) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

महानगरपालिकेतर्फे 'स्वच्छ भारत अभियान' अंमलबजावणी आणि जनजागृती करण्यात येते. तसेच स्वच्छता विषयक सुविधांमध्ये ओला आणि सुका कचरा वेगळा करण्यासाठी जनजागृती करणे आणि घनकचरा जमा करणे, रस्ते झाडणे, सार्वजनिक प्रसाधनगृहांची अवस्था, गटारांची साफसफाई आणि तुंबलेल्या पाण्याचा निचरा यासारख्या सुविधा प्रशासनाकडून पुरविल्या जातात. स्वच्छता विषयक सेवांबद्दल १७% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २८% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ ११.६% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'चांगले' (३) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

सुरक्षेच्या दृष्टीने पथदिवे आवश्यक असतात त्यामध्ये दिवे नियमितपणे चालू असणे आणि बंद पडल्यास दुरुस्ती करणे, दिव्यांचा पुरेसा प्रकाश असणे, सर्व गल्लीबोळांत आणि मुख्य रस्त्यांवर दिव्यांची उपलब्धता, सौर ऊर्जेवरील दिवे किंवा 'स्मार्ट स्ट्रीट लाईट' यंत्रणेचा वापर यासारख्या सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. पथदिवे विषयक सेवांबद्दल २२.२% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३७.३% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ ५.७% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'चांगले' (२) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

शिक्षण सर्वांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक आवश्यक साधन आहे. शिक्षणाची सुविधा सामाजिक आपण वैयक्तिकरित्या सर्वासाठी महत्वाची आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालीका क्षेत्रामध्ये उत्तम दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन खूप प्रयत्न करत असताना पाहायला मिळते. त्या शैक्षणिक विषयक सेवांबद्दल २०.६% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३५.८% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ ६.८% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'चांगले' (२) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

बदलत्या जीवनशैलीमुळे शारीरिक व्याधिंचे प्रमाण वेगाने वाढते आहे त्यादृष्टीने पिंपरी चिंचवड महानागपालिकेचे वैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना रुग्णालये, प्रसूतिगृहे, इतर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आपल्या नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य सेवा पुरवत आहे. आरोग्य विषयक सेवांबद्दल १३.४% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३८.२% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ १५.६% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'चांगले' (२) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

महानगरपालिकेतर्फे महिला व बाल कल्याण विभागामार्फत बचत गट अनुदान, शिलाई मशीन वाटप; अंगणवाडी सेवा, कुपोषण निर्मूलन आहार, बालवाड्यांची गुणवत्ता; जननी सुरक्षा योजना, लसीकरण मोहिमा, सॅनिटरी नॅपकिन वाटप; महिलांसाठी संगणक किंवा ब्युटी पार्लर प्रशिक्षण यासारख्या सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. महिला व बाल कल्याण विषयक सेवांबद्दल १५.१% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २६.३% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ २०.८% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'समाधानकारक' (३) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

महानगरपालिकेतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रे, वाचनालये आणि उद्याने, मालमत्ता करात सवलत, बस प्रवासातील सवलत आणि पेन्शन योजना उपलब्ध करून दिल्या जातात. ज्येष्ठ नागरिक सेवा सुविधाबद्दल विषयक सेवांबद्दल १६.७% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३१.४% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ २३.५% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'समाधानकारक' (३) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

महानगरपालिकेकडून पुरविण्यात येणारे कौशल्य विकास प्रशिक्षण आणि त्याची गुणवत्ता, प्रशासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची वेळेवर उपलब्धता, उत्पादित माल विकण्यासाठी महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेली जागा किंवा प्रदर्शने भरवणे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेद्वारे 'पावनाथडी' हे महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देणारे प्रमुख प्रदर्शन आहे. यात महिला उद्योजकांना स्टॉल, स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन, आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध योजनांच्या माध्यमातून हक्काची जागा यामार्फत उपलब्ध करून दिली जाते, जी महिला सक्षमीकरणाची एक प्रमुख योजना आहे. आर्थिक व स्वयंरोजगार विषयक सेवांबद्दल १५.९% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २२.९% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ २३.७% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'समाधानकारक' (३) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

वाहतूक आणि दळणवळण हे शहराच्या विकासामध्ये योगदान देणारा प्रमुख घटक आहे. आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगती मुख्यत्वे रस्त्यांच्या बांधकाम आणि देखभालीवर अवलंबून असते. एक सुव्यवस्थित अंतर्गत रस्त्यांचे जाळे ही सुविधांइतकीच नागरी गरज आहे. रस्त्यांची देखभाल आणि बांधकाम विषयक सेवांबद्दल १२.२% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३९.४% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ २१.५% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'चांगले' (२) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

शहराची पर्यावरणीय स्थिती उंचावण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका मोठे योगदान देत आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका परिसरात दोन दशलक्ष झाडे लावण्यात आली आहेत. शहरात 88 उद्यान असून आणखी 40 उद्यानांचे काम सुरू आहे. उद्यानांची देखभाल आणि विकास विषयक सेवांबद्दल ९.५% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ४६.१% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ १६.५% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'चांगले' (२) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

क्रीडा उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ३ क्रीडा स्टेडियम, ७ जलतरण तलाव, ६ बॅडमिंटन हॉल, ५७व्यायामशाळा, ५ टेनिस कोर्ट, १ पॉलीग्रास हॉकी ग्राउंड, १ कुस्ती केंद्र, २ बॉक्सिंग रिंग आणि १ रॅपलिंग वॉल बांधले आहेत. क्रीडांगणांची देखभाल आणि विकास विषयक सेवांबद्दल १७.९% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २८.०% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ १७.२% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'समाधानकारक' (३) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

महानगरपालिकेकडून बाजारासाठी नवीन जागा, ओटे, छत, रस्ते आणि पार्किंग साठी जागा उपलब्ध करून देण्याच्या सेवा सुविधांचा समावेश होतो. बाजारांची देखभाल आणि विकास सुविधाबद्दल विषयक सेवांबद्दल १०.०% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३८.५% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ २१.५% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'समाधानकारक' (३) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

सध्याच्या वाढत्या विकासाच्या काळात पाण्याचे नियोजन करणे अतिशय आवश्यक आहे. त्यासाठी महानगरपालिकेतर्फे सांडपाण्याचे संकलन करून त्यावर मैलाशुद्धीकरण प्रकल्पात प्रक्रिया करण्यात येत आहे, जेणेकरून नैसर्गीक जलस्रोतांवर होणारा विपरीत परिणाम कमी होऊन पाणी प्रदूषणात घट होईल. सांडपाण्याची विल्हेवाट विषयक सेवांबद्दल ११.३% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २९.२% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ ३३.५% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'समाधानकारक' (३) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

घनकचरा व्यवस्थापन हे घटनात्मक कार्यांपैकी एक आहे आणि महानगरपालिकांचे सर्वात मूलभूत कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य बऱ्याच प्रमाणात घनकचरा व्यवस्थापनाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. घनकचरा व्यवस्थापन विषयक सेवांबद्दल १६.३% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३२.३% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ २३.७% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'समाधानकारक' (३) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

महानगरपालिकेतील नागरिकांना आपत्कालीन सेवांमध्ये अग्निशमन सेवा प्रतिसादाचा वेळ, उपकरणांची उपलब्धता; वैद्यकीय आपत्कालीन सेवा : १०८ रुग्णवाहिका सेवा, डॉक्टरांची उपलब्धता आणि आपत्ती व्यवस्थापन यासारख्या सेवा सुविधांचा समावेश होतो. आपत्कालीन सेवा विषयक सेवांबद्दल २०.१% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ४२.७% 'चांगले' समाधान व्यक्त केले, तर केवळ २२.४% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते. समाधानाचा मध्यक (Median) 'चांगले' (२) या श्रेणीत आढळलेला बघायला मिळतो.

## ८. निष्कर्ष (Findings):

१. २८.९% उत्तरदात्यांनी पाणीपुरवठा सेवा सुविधाबद्दल 'उत्कृष्ट' असल्याचे आणि २९.९% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
२. स्वच्छता विषयक सेवांबद्दल १७% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २८% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
३. पथदिवे विषयक सेवांबद्दल २२.२% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३७.३% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
४. शैक्षणिक विषयक सेवांबद्दल २०.६% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३५.८% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
५. आरोग्य विषयक सेवांबद्दल १३.४% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३८.२% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
६. महिला व बाल कल्याण विषयक सेवांबद्दल १५.१% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २६.३% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे. तर २०.८% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते.
७. ज्येष्ठ नागरिक सेवा सुविधाबद्दल विषयक सेवांबद्दल १६.७% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३१.४% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे. तर २३.५% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते
८. आर्थिक व स्वयंरोजगार विषयक सेवांबद्दल १५.९% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २२.९% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे. तर केवळ २३.७% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते.
९. रस्त्यांची देखभाल आणि बांधकाम विषयक सेवांबद्दल १२.२% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३९.४% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
१०. क्रीडांगणांची देखभाल आणि विकास विषयक सेवांबद्दल १७.९% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २८.०% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
११. बाजारांची देखभाल आणि विकास सुविधाबद्दल विषयक सेवांबद्दल १०.०% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३८.५% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
१२. सांडपाण्याची विल्हेवाट विषयक सेवांबद्दल ११.३% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि २९.२% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे.
१३. घनकचरा व्यवस्थापन विषयक सेवांबद्दल १६.३% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ३२.३% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे. तर २३.७% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येते.
१४. आपत्कालीन सेवा विषयक सेवांबद्दल २०.१% उत्तरदात्यांनी 'उत्कृष्ट' आणि ४२.७% 'चांगले' समाधान व्यक्त केलेले आहे. तर केवळ २२.४% उत्तरदाते 'असमाधानकारक' असल्याचे दिसून येत आहे.

## ९. शिफारसी (Recommendations):

१. केवळ आर्थिक मदत देण्यापेक्षा तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी अधिक निधी खर्च करावा.
२. समाज कल्याण विभागाच्या प्रत्येक रुपयाचा परिणाम मोजण्यासाठी सामाजिक लेखापरीक्षण सुरू करावे.
३. बचत गटांच्या उत्पादनांसाठी महानगरपालिकेने हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.
४. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी असलेल्या योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी 'माहिती केंद्र' सुरू करावीत.

५. घराघरातूनच ओला, सुका आणि घातक कचरा वेगळा करण्यासाठी महानगरपालिकेने नियमावलीचे काटेकोर पालन करण्यासाठी अंमलबजावणी करावी.
६. आरोग्यविषयक सुविधांमध्ये पारदर्शकता आणून अधिक सक्षम करण्यात याव्या.

**१०. समारोप (Conclusion):**
प्रस्तुत संशोधनावरून असे दिसून येते की, महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, स्वच्छता, पथदिवे, शैक्षणिक, आरोग्य, ज्येष्ठ नागरिक सेवा, रस्त्यांची देखभाल आणि बांधकाम, उद्यानांची देखभाल आणि विकास, क्रीडांगणांची देखभाल आणि विकास, घनकचरा व्यवस्थापन आणि आपत्कालीन सेवा या सेवांना नागरिकांनी 'चांगले' रेटिंग दिले आहे, मात्र स्वच्छता, आरोग्य, महिला व बाल कल्याण, ज्येष्ठ नागरिक सेवा, आर्थिक व स्वयंरोजगार, रस्त्यांची देखभाल आणि बांधकाम, बाजारांची देखभाल आणि विकास, सांडपाण्याची विल्हेवाट, घनकचरा व्यवस्थापन आणि आपत्कालीन सेवा या क्षेत्रांत सुधारणेला मोठी वाव आहे.
सामाजिक सेवावर झालेला खर्च शहराच्या मानवी विकास निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी पूरक ठरलेला आहे. तथापि, केवळ निधीची तरतूद करणे पुरेसे नसून, त्या निधीचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हे एक मोठे आव्हान असते. या संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सामाजिक सेवांवरील आर्थिक तरतुदीचा नागरिकांना चांगला लाभ झालेला आहे. आणि सामाजिक सेवा सुविधांची परिणामकारकता सुद्धा चांगली आहे. महानगरपालिकेतर्फे पुरविल्या जाणाऱ्या सामाजिक सेवांची उपलब्धता समाधानकारक असली, तरी ती पूर्णपणे सर्वसमावेशक असलेली पाहायला मिळत नाही. 'उत्कृष्ट' श्रेणीतील सेवांचे प्रमाण वाढवण्यासाठी प्रशासनाने पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. या संशोधनातून समोर आलेल्या त्रुटी दूर केल्यास, महानगरपालिका एक खऱ्या अर्थाने 'स्मार्ट' आणि 'कल्याणकारी' संस्था म्हणून नावारूपास येईल.

**संदर्भ सूची:**
१. आगलावे प्रदिप (२००२), संशोधन पध्दतीशास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, पेज नं. १७९ ते २०६.
२. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१३), पुणे जिल्हा.
३. पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल-२०१२-१३, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पेज नं. १७.
४. पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल-२०२१-२२, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पेज नं. ६ ते १० आणि १२ ते ४०.
५. पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल-२०२२-२३, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पेज नं. २५ ते ३६.
६. भांडारकर पु. ल. (१९८७), सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, पेज नं. ३ ते ५, ८२, २०१ ते २०७.
७. Gera Nina. (2007), Social sector expenditures and outcomes: A case study of the Punjab in the 1990s, Pakistan Economic and Social Review, 45(1), 27-54.
८. Goswami, B., & Bezbaruah, M. P. (2011). Social Sector Expenditures and Their Impact on Human Development: The Indian Experience. Indian Journal of Human Development, 5(2), 365-385
९. Pimpri Chinchwad City Development Plan 2006-12 (June 2006), volume I.